**प्रेसनोट** दि. २७/०६/२०२४

बावधन वाहतुक विभाग, पिंपरी चिंचवड येथील पोलीस नाईक याचेवर लाच मागणी व स्विकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | हिंजवडी पोलीस स्टेशन, पिंपरी – चिंचवड आयुक्तालय |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ३२ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. समाधान वालचंद लोखंडे, वय ३९ वर्ष, पद – पोलीस नाईक, ब.नं. २९३६, नेमणुक - बावधन वाहतुक विभाग, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, पुणे. (वर्ग-३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- रुपये |
| पडताळणीअंती लाच मागणी रक्कम | ५,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ५,०००/- रुपये (पाच हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | दि. २६/०६/२०२४ रोजी |
| सापळा दिनांक | दि. २७/०६/२०२४ |

ठिकाण :- दिनांक २७/०६/२०२४ रोजी बावधान वाहतुक पोलीस चौकी समोर, पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचा उत्खनन केलेली माती व व इतर मटेरीअल ने-आण करण्यासाठी माल वाहतुक गाडयांचा व्यवसाय आहे. लोकसेवक पोलीस नाईक समाधान लोखंडे यांनी तक्रारदार यांचेकडे उत्खननातील माती वाहून नेणारे वाहनांवर विनाकारवाई वाहतुक चालु ठेवण्यासाठी प्रत्येक गाडीला १,०००/- रुपये याप्रमाणे तक्रारदार यांचेकडे पाच गाडयांचे एकुण ५,०००/- रुपयाची लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, लोकसेवक पोलीस नाईक समाधान लोखंडे यांनी तक्रारदार यांचेकडे वरील नमुद कामासाठी पंचासमक्ष तडजोडीअंती ५,०००/- रुपयांची लाच मागणी करुन, लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडून रुपये ५,०००/- लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यावर त्याना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध हिंजवडी पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड आयुक्तालय, पुणे येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक विरनाथ माने तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner